# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्र.रानिआ/नप-२०१७/प्र.क्र.२/का.६,
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १२/०६/२०१७.

विषय :- राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषदा/नगरपंचायत/जिल्हा परिषद/
पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांचे कामकाज करणाऱ्या अधिकारी/
कर्मचारी यांना मानधन/अतिकालिक भत्ता मंजूर करण्याबाबत...

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका लोकसभा / विधानसभाप्रमाणे निर्भय, पारदर्शक वातावरणामध्ये व्हाव्यात याकरिता भारतीय घटनेमध्ये सन १९९२ साली दुरुस्ती करण्यात आली असून, प्रत्येक राज्यामध्ये एका स्वतंत्र राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आलेली आहे.

२. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्यामार्फत दर ५ वर्षानी २८००० पेक्षा जास्त स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये २,५०,००० लाखापेक्षा जास्त लोकप्रतिनिधी निवडूण दिले जातात. या निवडणूकीची सर्व प्रक्रिया जवळजवळ लोकसभा/विधानसभेप्रमाणे असल्यामुळे, निवडणूकीमध्ये काम करणारे अधिकारी/ कर्मचारी यांना केलेल्या कामाचे मानधन व अतिकालिक भत्ता देणे आवश्यक आहे. मात्र राज्य निवडणूक आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, ब-याचदा ह्या अधिकारी / कर्मचारी यांना मानधन/ अतिकालिक भत्ते वेळेवर दिले जात नाहीत.

३. राज्यामध्ये नोव्हेंबर,२०१६ ते मे,२०१७ या कालावधीत खाली दर्शविल्याप्रमाणे मोठया प्रमाणांवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यात आल्या आहेत-

| अ.क्र. | स्थानिक स्वराज्य संस्था | एकूण जिल्हे | एकूण स्थानिक स्वराज्य संस्था |
|---|---|---|---|
| i | नगरपरिषदा / नगरपंचायती | ३३ | २१४ |
| ii | जिल्हा परिषदा / पंचायत समित्या | २५ | २५ / २८४ |
| iii | महानगरपालिका | १३ | १६ |

४. या निवडणूकीत काम केलेल्या काही अधिकारी/ कर्मचारी यांना मानधन/ अतिकालिक भत्त्याचे वाटप झाले आहे. मात्र काही ठिकाणी तसे झाल्याचे दिसून येत नाही. तसेच मानधन/ अतिकालिक भत्ता दराबाबत काही महानगरपालिका आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्या मनामध्ये साशंकता आहे. या विषयावर अभ्यास केल्यावर खालील प्रकारचे अधिकारी / कर्मचा-यांबाबत आदेश निर्गमित केल्याचे आढळून येत आहे:

| अ.क्र. | तपशील | महानगरपालिका | न.प./ नगरपंचायत | जि.प./पं.स. |
|---|---|---|---|---|
| i | मतदान /मतमोजणी (प्रत्यक्ष) | रा.नि.आयोग, दि.३१/०१/२०१२ | रा.नि.आयोग, दि.३१/०१/२०१२ | रा.नि.आयोग, दि.३१/०१/२०१२ |
| ii | निवडणूक निर्णय अधिकारी/ सहा.निव.निर्णय अधिकारी | नगर विकास विभाग, दि.१६/०७/२००७ | नगर विकास विभाग, दि.१६/०७/२००७ | ग्रामविकास विभाग, दि.३१/०३/२०१२ |
| iii | अराजपत्रित कर्मचारी अतिकालिक भत्ता | नगर विकास विभाग, दि.१६/०७/२००७ | नगर विकास विभाग, दि.१६/०७/२००७ | ग्रामविकास विभाग, दि.२४/०३/२०१७ |
| iv | राजपत्रित - मानधन | नगर विकास विभाग, दि.१६/०७/२००७ | नगर विकास विभाग, दि.१६/०७/२००७ | ग्राम विकास विभाग, दि.३१/०३/२०१२ |

५. मानधन/ अतिकालिक भत्ता देण्याच्या पध्दतीत सुसुत्रता आणण्याच्या दृष्टीने व संभ्रम दूर करण्याच्या दृष्टीने सर्व बाबींचा विचार करुन राज्य निवडणूक आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आ दे श

६. नोव्हेंबर १६ ते मे, २०१७ या कालावधीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये (महानगरपालिका/ नगरपरिषद/नगरपंचायत/जिल्हा परिषद/ पंचायत समिती) काम करणा-या अधिकारी/ कर्मचारी यांना निवडणूकीच्या वेळी त्यांच्या वेतनावर आधारित खालील तक्त्यातील आदेशाप्रमाणे मानधन/ अतिकालिक भत्ता अनुज्ञेय राहील:

| अ. क्र. | तपशील | महानगरपालिका | नगर परिषद/ नगरपंचायत | जिल्हा परिषद/ पंचायत समिती | सार्वत्रिक किंवा पोट निवडणूक |
|---|---|---|---|---|---|
| १ | मतदान/मतमोजणी (प्रत्यक्ष) | रा.नि.आयोग, दि.३१/०१/२०१२ | रा.नि.आयोग, दि.३१/०१/२०१२ | रा.नि.आयोग, दि.३१/०१/२०१२ | दोन्हींकरिता |
| २ | निवडणूक निर्णय अधिकारी / सहायक निवडणूक निर्णय अधिकारी | नगर विकास विभाग, दि.१६/०७/२००७ | नगर विकास विभाग, दि.१६/०७/२००७ | ग्रामविकास विभाग, दि.३१/०३/२०१२ | दोन्हींकरिता |
| ३ | अराजपत्रित | नगर विकास विभाग, दि.१६/०७/२००७ | नगर विकास विभाग, दि.१६/०७/२००७ | ग्रामविकास विभाग, दि.२४/०३/२०१६ | फक्त सार्वत्रिककरिता |
| ४ | राजपत्रित - मानधन | नगर विकास विभाग, दि.१६/०७/२००७ | नगर विकास विभाग, दि.१६/०७/२००७ | ग्राम विकास विभाग, दि.३१/०३/२०१२ | फक्त सार्वत्रिककरिता |

७. i) राज्य निवडणूक आयोग किंवा राज्य शासनाने या विषयावर (वरील तक्त्याशिवाय) जर इतर काही आदेश पारित केले असतील तर जिल्हाधिकारी/ महानगरपालिका आयुक्तांनी तसे त्वरित राज्य निवडणूक आयोगाच्या नजरेस आणावे.

ii) जर एखाद्या अधिकारी/ कर्मचारी यांना परिच्छेद ७ (i) प्रमाणे वरील तक्त्यांपेक्षा (परिच्छेद ६)जास्त मानधन/ अतिकालिक भत्ता अदा करण्यात आला असेल तर त्याची वसूली करण्यात येऊ नये. मात्र जर कमी मानधन/ अतिकालिक भत्ता देण्यात आला असेल तर अनुज्ञेय अधिकचे मानधन/ अतिकालिक भत्ता (परिच्छेद क्र.६) प्रमाणे देण्यात यावा.

८. i) वरील निवडणूकीमध्ये प्रत्यक्ष काम करणा-या अधिकारी/कर्मचारी यांना प्रत्येक निवडणूकीसाठी स्वतंत्र मानधन/अतिकालिक भत्ता देण्यात यावा. (वरील तक्त्याचा १ व २ प्रमाणे मतदान प्रक्रिया / मतमोजणी, निवडणूक निर्णय अधिकारी/सहाय्यक निवडणूक अधिकारी )

ii) मात्र प्रत्यक्ष रुपात काम न करता, ज्या जिल्ह्यात दोन्ही सार्वत्रिक निवडणूकीत (नगरपरिषदा/ नगरपंचायत व जिल्हापरिषदा/ पंचायत समिती) पर्यवेक्षकीय पध्दतीने ज्या अधिकारी/कर्मचा-यांनी (वरील तक्त्याच्या ३ व ४ प्रमाणे अराजपत्रित / राजपत्रित अधिकारी / कर्मचारी) काम केले असेल त्यांना दोन्ही सार्वत्रिक निवडणूकीसाठी वेगवेगळे मानधन/अतिकालिक भत्ता अदा न करता एकदाच भत्ता देण्यात यावा.

९. **मुख्य निवडणूक निरीक्षक/ निवडणूक निरीक्षक/सहाय्यक निवडणूक निरीक्षक यांना मानधन:-**

वरील निवडणूकीत खाली तक्त्याप्रमाणे ज्या अधिका-यांनी मुख्य निवडणूक निरीक्षक/निवडणूक निरीक्षक, आयकर निरीक्षक, सहाय्यक निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून काम केलेले असेल त्यांना खाली दर्शविल्याप्रमाणे एकरकमी मानधन देण्यात यावे.

| अ. क्र. | स्थानिक स्वराज्य संस्था | मुख्य निवडणूक निरीक्षक (रु.२०,०००/) | निवडणूक निरीक्षक (रु.१५,०००/) | आयकर निरीक्षक (रु.१५,०००/) | सहाय्यक निवडणूक खर्च निरीक्षक (रु.७५००/) |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ |
| ०१ | महानगर पालिका | वरिष्ठ सचिव | अतिरिक्त जिल्हाधिकारी किंवा तत्सम अधिकारी | आयकर अधिकारी | विक्रीकर अधिकारी |
| ०२ | नगर परिषद/ नगर पंचायत | मुख्य कार्यकारी अधिकारी | अतिरिक्त जिल्हाधिकारी किंवा तत्सम अधिकारी | - | - |
| ०३ | जिल्हा परिषद / पंचायत समिती | मुख्य कार्यकारी अधिकारी | अतिरिक्त जिल्हाधिकारी किंवा तत्सम अधिकारी | - | - |

१०. वरील बाबींवर होणारा सर्व खर्च महानगरपालिका आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी खालीलप्रमाणे अदा करावे.

| अ.क्र. | स्थानिक स्वराज्य संस्था | जबाबदार अधिकारी | निधीचा स्रोत |
|---|---|---|---|
| ०१ | महानगरपालिका | महानगरपालिका आयुक्त | महानगरपालिकेचा निधी |
| ०२ | नगर परिषद / नगर पंचायत | जिल्हाधिकारी | नगर परिषद / नगर पंचायतीचा निधी |
| ०३ | जिल्हा परिषदा/पंचायत समिती | जिल्हाधिकारी | शासनाने उपलब्ध करुन दिलेले अनुदान |

११. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी राज्य शासनाच्या गृह विभागाने मुंबई पोलिस कायदा, १९५१ मधील तरतुदीनुसार विशेष पोलिस अधिकाऱ्यांची नियुक्ती केल्यास अशा विशेष पोलिस अधिकाऱ्यांना मानधन मंजूर करण्यासंदर्भातील आदेश गृह विभागाने निर्गमित करावेत व त्यासाठी आवश्यक तो निधीही त्या विभागानेच उपलब्ध करुन द्यावा.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(शेखर चन्ने)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :- १. सर्व विभागीय आयुक्त
२. सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
३. सर्व महानगरपालिका आयुक्त
४. मा.आयुक्त, राज्य निवडणूक आयोग यांचे स्वीय सहायक, मुंबई.
५. सचिव, राज्य निवडणूक आयोग यांचे स्वीय सहायक, मुंबई
६. सर्व कार्यासने, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासन भवन, मुंबई
७. निवडनस्ती, कार्यासन ६, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.